Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# माजलगाव आणि गेवराई तालुक्यांतील साक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास

**सजगणे महादेव देविदास[1] , डॉ.भगवान प्रभाकरराव शेंडगे[2]**

1संशोधक विध्यार्थी, भूशास्त्र संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
2सहाय्यक प्राध्यापक , बी. रघुनाथ कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, परभणी
(madhavsajgane@gmail.com[1])

**सारांश (Abstract):**

साक्षरता ही कोणत्याही समाजाच्या विकासाचे अत्यंत महत्त्वाचे परिमाण आहे. बीड जिल्ह्याच्या माजलगाव आणि गेवराई तालुक्यांतील गावनिहाय साक्षरतेचा अभ्यास हा या शोधनिबंधाचा मुख्य हेतू आहे. या अभ्यासात प्रत्येक तालुक्यातून १० गावे निवडून त्यांची साक्षरता दर, लोकसंख्या आणि स्थैर्य यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. बीड जिल्ह्याचा साक्षरता दर राज्याच्या तुलनेत कमी आहे. स्त्री साक्षरतेत विशेषतः मोठी तफावत आहे. या अभ्यासाच्या निष्कर्षावर आधारित उपाय योजनाही सुचवण्यात आल्या आहेत.

बीजसंज्ञा: साक्षरता, लोकसंख्या, महिला साक्षरता, तालुकानिहाय तुलना, बीड जिल्हा

## १. प्रस्तावना (Introduction):

शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विकासाचे मूलभूत साधन आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला केवळ वाचन, लेखन आणि गणिताची मूळ कौशल्ये प्राप्त होत नाहीत, तर तो आपल्या जीवनातील निर्णय अधिक विचारपूर्वक घेऊ लागतो. साक्षर व्यक्ती आपल्या कुटुंबाच्या आरोग्य, स्वच्छता, शिक्षण आणि आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्नशील असते. त्यामुळे शिक्षणाचा परिणाम व्यक्तीच्या विकासावरच नव्हे तर एकूण समाजाच्या प्रगतीवर होतो. भारतातील ग्रामीण भागात शिक्षण हे अजूनही अनेक सामाजिक व भौगोलिक अडथळ्यांमुळे पूर्णपणे सर्वसमावेशक झालेले नाही. विशेषतः महिला शिक्षण, आदिवासी व मागासवर्गीय लोकसंख्येमध्ये साक्षरतेचे प्रमाण तुलनेने कमी आहे. अशा परिस्थितीत साक्षरता दर हा मानवी विकासाचा एक महत्त्वाचा संकेतक मानला जातो. संयुक्त राष्ट्रसंघ, युनेस्को आणि इतर जागतिक संस्थाही साक्षरतेला एक मूलभूत मानवी हक्क मानतात. साक्षरता म्हणजे केवळ अक्षरओळख नसून व्यक्तीला वाचता, लिहिता, माहिती समजून घेता आणि वापरता येणे हा त्यामागचा अर्थ आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला सामाजिक जबाबदारीची जाणीव होते, पर्यावरणविषयक जागरूकता येते, आरोग्य सुधारते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लिंग समानतेकडे वाटचाल होते. म्हणूनच साक्षरता ही एक व्यक्तिनिष्ठ तसेच सामूहिक विकासाची गुरुकिल्ली आहे. भारता मध्ये ६ वर्षा पेक्ष अधिक वय असणारा व वाचता, लिहिता येणाऱ्यास साक्षर असे म्हणतात.

बीड जिल्हा  हा महाराष्ट्राच्या मराठवाडा विभागातील एक प्रमुख जिल्हा असून, त्याचा भौगोलिक विस्तार, सामाजिक रचना आणि आर्थिक स्रोत पाहता तो ग्रामीण व अर्धशहरी भागात विभागलेला आहे. जिल्ह्यात कृषिप्रधान समाज असून, अनेक भागांत अजूनही शिक्षणाच्या बाबतीत सुविधा अपुऱ्या आहेत. साक्षरतेच्या बाबतीत बीड जिल्हा राज्याच्या सरासरीपेक्षा मागे असून महिला साक्षरतेचे प्रमाण विशेषतः चिंताजनक आहे. २०११ च्या जनगणनेनुसार बीड जिल्ह्याचा एकूण साक्षरता दर ७६.९९% होता, तर राज्याचा सरासरी साक्षरता दर ८२.३४% होता. जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये जसे की वडवणी, गेवराई, धारूर येथे महिला साक्षरता ६०% च्या खाली आहे, तर माजलगाव,अंबाजोगाई, बीड, परळी या तालुक्यांमध्ये ही स्थिती तुलनेत चांगली आहे.

या पार्श्वभूमीवर, प्रस्तुत शोधनिबंधात बीड जिल्ह्यातील दोन महत्त्वाच्या तालुक्यांचा – माजलगाव आणि गेवराई या तालुक्यातील गावनिहाय साक्षरतेच्या आधारावर तुलनात्मक अभ्यास केला आहे. प्रत्येक तालुक्यातून १० गावे यादृच्छिक पद्धतीने निवडून त्या गावांचा लोकसंख्या, साक्षरता दर आणि साक्षरतेतील स्थैर्य यांचे विश्लेषण केले गेले आहे. दोन्ही तालुक्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण जवळपास सारखे असले, तरी त्यामध्ये दिसणारे सामाजिक-सांस्कृतिक अंतर, स्त्री-पुरुष साक्षरतेतील तफावत, आणि गावनिहाय असमतोल हे या अभ्यासाचे महत्त्वाचे भाग आहेत. तुलनात्मक विश्लेषणाच्या माध्यमातून, स्थानिक प्रशासनाला आणि धोरणकर्त्यांना उपयुक्त ठरतील असे निष्कर्ष व उपाय सुचविण्याचा या शोधनिबंधाचा प्रयत्न आहे. यामध्ये विशेष लक्ष महिला शिक्षण, लहान गावांतील साक्षरता, आणि साक्षरतेत सातत्य राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना यावर केंद्रित केले आहे


## २. उद्दिष्टे (Objectives):

साक्षरता ही व्यक्तीच्या जीवनमानातील एक क्रांतिकारक बदल घडवणारी प्रक्रिया आहे. बीड जिल्ह्यातील साक्षरतेतील भौगोलिक आणि सामाजिक विविधता लक्षात घेता, या शोधनिबंधाचे उद्दिष्ट पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत: बीड जिल्ह्यातील साक्षरतेतील स्थानिक पातळीवरचे बदल अभ्यासणे विशेषतः माजलगाव आणि गेवराई या तालुक्यांमध्ये गावनिहाय साक्षरतेची तुलना करून दोन्ही तालुक्यांमधील असमानता ओळखणे व कोणतीही भाषा विश्लेषण करणे. स्त्री-पुरुष साक्षरतेतील तफावत समजून घेणे व त्यावर प्रभाव टाकणारे घटक ओळखणे. साक्षरतेतील चढ-उतार व स्थैर्याचा अभ्यास करून धोरणात्मक सूचना सुचविणे.शासनाच्या शैक्षणिक योजनांच्या प्रभावाचे मूल्यमापन करणे आणि भविष्यातील सुधारणा सुचवणे.या उद्दिष्टांच्या आधारे संशोधन कार्य मार्गी लागले असून, प्रत्यक्ष आकडेवारी व विश्लेषणाच्या आधारे दोन्ही तालुक्यांमधील साक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास सादर करण्यात आला आहे.

## ३. बीड जिल्ह्याचा भौगोलिक परिचय:

बीड जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात स्थित असून, तो राज्याच्या दक्षिण-मध्य भागात येतो.

### ३.३ अभ्यासक्षेत्र (Study Area Mapp):



याचा विस्तार १८°२७′ ते १९°२७′ उत्तर अक्षांश आणि ७४°४९′ ते ७६°४४′ पूर्व रेखांश दरम्यान आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस छत्रपती सांभाजीनगर व जालना, पूर्वेस परभणी, दक्षिणेस लातूर व पश्चिमेस धाराशिव हे जिल्हे आहेत. बीड जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ११,१७९.२ चौ. किमी असून ते महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्राच्या सुमारे ३.४७% इतके आहे.

**३.१ सामाजिक व आर्थिक स्थिती:**

बीड जिल्हा मुख्यतः कृषिप्रधान असून, जिल्ह्यातील ८०% हून अधिक लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये अद्यापही शिक्षण, आरोग्य, वाहतूक व मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव जाणवतो. पावसावर आधारित शेती, स्थलांतर, बेरोजगारी आणि महिलांचे पारंपरिक भूमिका हे घटक साक्षरतेवर परिणाम करतात.

**३.२ निवडलेले तालुके माजलगाव आणि गेवराई :**

माजलगाव तालुका हा जिल्ह्याच्या पूर्व भागात असून, येथेही सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागास भाग मोठ्या प्रमाणात आहेत. माजलगावची सरासरी साक्षरता ७५.०६% असून ती गेवराईच्या तुलनेत किंचित अधिक आहे. तथापि, स्त्री-पुरुष साक्षरतेतील अंतर येथेही विद्यमान आहे. गेवराई तालुका हा जिल्ह्याच्या पूर्व-मध्य भागात येतो. २०११ च्या जनगणनेनुसार गेवराई तालुक्याची सरासरी साक्षरता ७३.८५% आहे. मात्र तालुक्यांतर्गत गावनिहाय साक्षरतेत मोठी तफावत दिसते. काही गावे शिक्षणात अग्रेसर आहेत, तर काही ठिकाणी परिस्थिती चिंताजनक आहे. या दोन्ही तालुक्यांतील निवडक १० गावांचा अभ्यास करून साक्षरतेतील स्थैर्य, गावनिहाय तफावत, आणि संभाव्य धोरणात्मक आवश्यकता यांचे विश्लेषण या शोधनिबंधात करण्यात आले आहे.

**४. माहितीस्त्रोत व अभ्यासपद्धती : (Data Sources and Methodology):**

**४.१ माहितीस्त्रोत (Sources of Data):**

या शोधनिबंधासाठी वापरलेली सर्व माहिती दुय्यम (secondary) स्वरूपाची आहे. विश्लेषणासाठी खालील स्रोतांचा वापर करण्यात आला आहे:

1. **भारत सरकार जनगणना २०११**
   गावनिहाय लोकसंख्या आणि साक्षरता दर , तालुकानिहाय पुरुष-महिला साक्षरता दर
2. **बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक आढावा अहवाल (२०११)**
   शैक्षणिक सुविधा, लोकसंख्या वितरण, सामाजिक परिस्थिती
3. **जिल्हा माहिती कार्यालय व सांख्यिकी विभागाचे अहवाल**
   तालुकास्तरावरील आराखडे व आकडेवारी
4. **इतर वैज्ञानिक व शैक्षणिक संदर्भ (उदा. मोटे, रामोत्रा, युनेस्को अहवाल)**
   साक्षरतेचे आंतरराष्ट्रीय संदर्भ, व्याख्या व अभ्यास पद्धती

**४.२ अभ्यासपद्धती (Methodology):**

या संशोधनासाठी विश्लेषणाची संपूर्ण प्रक्रिया सांख्यिकीय व तुलनात्मक (statistical & comparative) पद्धतीने पार पाडण्यात आली आहे. पद्धती खालीलप्रमाणे आहे:

**क. गावांची निवड (Sampling of Villages):**

बीड जिल्ह्यातील माजलगाव आणि गेवराई या दोन तालुक्यांमधून प्रत्येकी १० गावे यादृच्छिक पद्धतीने (Random Sampling) निवडण्यात आली. निवड करताना ग्रामीण लोकसंख्या, भौगोलिक स्थान व लोकसंख्येचा स्तर लक्षात घेण्यात आला.

**ख. निकषांची निवड (Selection of Indicators):**

अ) गावानिहाय साक्षरता दर (%)

ब) गावानिहाय लोकसंख्या

क) स्त्री-पुरुष साक्षरतेतील तफावत (तालुकास्तरावर)

ड) साक्षरतेतील चढ-उताराचा फरक (highest – lowest)

ई) सरासरी साक्षरता व लोकसंख्या

ग. विश्लेषण प्रक्रिया (Analysis **Technique):**

**1**. तालुकानिहाय व गावानिहाय तुलनात्मक तक्ते तयार करण्यात आले.
2. सांख्यिकीय सूत्रांचा उपयोग करून सरासरी, फरक व स्थैर्य यांचे विश्लेषण.
3. आरेख (bar chart, comparison graphs) वापरून दृकश्राव्य सादरीकरण.
4. शेवटी गणितीय विश्लेषण, निरीक्षणे व धोरणात्मक सूचना तयार करण्यात आल्या.

**घ. साक्षरतेची व्याख्या:**

भारत सरकारच्या २०११ च्या जनगणनेनुसार साक्षरता म्हणजे **"सात वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक वयाचा कोणताही व्यक्ती एखादी भाषा वाचू शकत असेल, समजू शकत असेल व लिहू शकत असेल अशया व्यक्तीला साक्षर असे म्हणावे"** या अभ्यासपद्धतीचा उपयोग करून सखोल आणि वैज्ञानिक पद्धतीने तुलनात्मक निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केला आहे. हे निष्कर्ष केवळ साक्षरतेच्या स्थितीवर प्रकाश टाकत नाहीत, तर भविष्यातील शैक्षणिक धोरणांच्या निर्मितीसाठी दिशादर्शक ठरू शकतात.

**५. गावनिहाय विश्लेषण (Village-wise Analysis)** यात भाग सविस्तर स्वरूपात दिला आहे. यात माजलगाव आणि गेवराई तालुक्यातील निवडलेल्या गावांचा साक्षरतेच्या आधारावर सखोल तुलनात्मक अभ्यास केला आहे. या अभ्यासात माजलगाव आणि गेवराई तालुक्यातून प्रत्येकी १० गावे निवडून त्यांची साक्षरता व लोकसंख्या यांचे विश्लेषण केले गेले आहे. निवडलेली गावे सामाजिक, भौगोलिक व लोकसंख्येच्या दृष्टीने विविध स्तरांवरील आहेत, त्यामुळे साक्षरतेवरील स्थानिक प्रभाव स्पष्टपणे दिसून येतात.

**५.१ माजलगाव तालुक्यातील गावे:**

| अनू.क्र. | गावाचे नाव | लोकसंख्या | साक्षरता दर (%) |
|---|---|---|---|
| १. | पाथरुड | ११२८७ | ६१.८७ |
| २. | भाटवडगाव | ३६४२ | ६९.२५ |
| ३. | चिंचगव्हाण | ३२४८ | ७४.२० |
| ४. | राजेगाव | २५८७ | ६७.०७ |
| ५. | माळीपारगाव | २५२९ | ५६.७४ |
| ६. | घालतवाडी | १६७७ | ५८.८० |
| ७. | हिवरा बी.के. | १७२१ | ५७.३५ |
| ८. | देवखेडा | ८९८ | ६१.६९ |
| ९. | वसंतनगर | ३६४ | ६५.६६ |
| १०. | फुल पिंपळगाव | २५१ | ६९.७२ |

**निरीक्षणे:**

चिंचगव्हाण हे गाव ७४.२०% साक्षरतेसह माजलगावमधील सर्वाधिक साक्षर गाव ठरते. माळीपारगाव हे सर्वात कमी साक्षर गाव असून त्याचा साक्षरता दर ५६.७४% आहे.येथेही काही लहान गावांमध्ये (उदा. फुल पिंपळगाव, वसंतनगर) साक्षरतेचा दर चांगला आहे.माजलगाव तालुक्यातील साक्षरतेतील तफावत तुलनेने कमी आहे, जे दर्शवते की शिक्षणाचे वितरण तुलनेत समांतर आहे.

**५.२गेवराई तालुक्यातील गावे:**

| क्र. | गावाचे नाव | लोकसंख्या | साक्षरता दर (%) |
|---|---|---|---|
| १. | तलवाडा | १००७० | ५९.५८ |
| २. | उमापूर | ८४७९ | ६२.१८ |
| ३. | गाधी | ४२७० | ७४.१५ |
| ४. | रेवकी | २७३२ | ५१.३२ |
| ५. | लुखामस्ला | २३४३ | ५८.६४ |
| ६. | भेंड टाकळी | २४४४ | ६८.७० |
| ७. | कुंभारवाडी | १६३३ | ६९.६३ |
| ८. | मालेगाव ख. | २५४१ | ६३.५६ |
| ९. | हिवरवाडी | ८४७ | ५८.४४ |
| १०. | सैदापूर | ७७० | ७०.१३ |

**निरीक्षणे:**

गाधी हे गाव ७४.१५ % साक्षरतेसह सर्वाधिक साक्षर गाव आहे. रेवकी या गावात साक्षरता केवळ ५१.३२% असून ते सर्वात कमी साक्षर आहे. लक्षवेधी बाब म्हणजे लहान गावांमध्येही (उदा. सैदापूर, कुंभारवाडी) साक्षरतेचा दर्जा चांगला आहे. काही मोठ्या लोकसंख्येच्या गावांमध्ये (उदा. तलवाडा) साक्षरतेचा दर अपेक्षेपेक्षा कमी आहे.

**५.३ प्राथमिक तुलना (Preliminary Comparison):**

| निकष | माजलगाव | गेवराई |
|---|---|---|
| सर्वाधिक साक्षर गाव | चिंचगव्हाण (७४.२०%) | गाधी (७४.१५ %) |
| सर्वात कमी साक्षर गाव | माळीपारगाव (५६.७४%) | रेवकी (५१.३२%) |
| साक्षरतेतील चढ-उतार फरक | १७.४६% | २२.८३% |
| सरासरी लोकसंख्या | ३८५१ लोकसंख्या | ३३३७ लोकसंख्या |
| साक्षरतेतील स्थैर्य | अधिक – तुलनात्मक स्थैर्य | कमी – मोठी तफावत |

**५.४ महत्त्वाचे निष्कर्ष:**

सर्वाधिक साक्षरतेचे प्रमाण दोन्ही तालुक्यांमध्ये सुमारे ७४ % असून ते प्रशंसनीय आहे. सर्वात कमी साक्षरतेचा फरक माजलगावमध्ये कमी आहे, याचा अर्थ म्हणजे तेथील शैक्षणिक योजना अधिक समतोल आहेत. लोकसंख्या व साक्षरता यांच्यात थेट संबंध नाही. काही लहान गावांमध्ये अधिक साक्षरता आहे.स्त्री साक्षरता ही या आकडेवारीमध्ये न दिलेली असली तरी इतर अहवालांनुसार दोन्ही तालुक्यांमध्ये ती राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहे.

**६. तुलनात्मक विश्लेषण (Comparative Analysis):**

माजलगाव आणि गेवराई तालुक्यांतील निवडलेल्या १० गावांच्या साक्षरता दर, लोकसंख्या व चढ-उताराच्या निकषांवर आधारित तुलनात्मक विश्लेषण पुढीलप्रमाणे सादर केले आहे. या विश्लेषणातून दोन्ही तालुक्यांतील साक्षरतेचे स्वरूप, तफावत व स्थैर्य अधिक स्पष्टपणे समजते.

**६.१ आकडेवारी आधारित तुलना:**

| विश्लेषणाचे निकष | माजलगाव (१० गावे) | गेवराई (१० गावे) |
|---|---|---|
| सरासरी साक्षरता दर (%) | ६४.६४ % | ६४.०३ % |
| सर्वाधिक साक्षर गाव | चिंचगव्हाण (७४.२० %) | गाधी (७४.१५ %) |
| सर्वात कमी साक्षर गाव | माळीपारगाव (५६.७४ %) | रेवकी (५१.३२ %) |
| साक्षरतेतील चढ-उतार फरक | १७.४६ % (७४.२० – ५६.७४ | २२.८३ % (७४.१५ – ५१.३२ ) |
| गावांची सरासरी लोकसंख्या | ३,८५१ लोकसंख्या | ३,३३७ लोकसंख्या |
| साक्षरतेतील स्थैर्य | अधिक स्थिर – कमी तफावत | कमी – मोठी तफावत |

### ६.२ विश्लेषणात्मक मुद्दे:

**१. सरासरी साक्षरता:**

दोन्ही तालुक्यांची सरासरी साक्षरता जवळपास सारखी आहे (६४%), मात्र माजलगावची सरासरी थोडीशी अधिक आहे. ही साक्षरता दर राज्याच्या सरासरी ८२.३४% पेक्षा कमी आहे, यावरून स्थानिक स्तरावर अधिक लक्ष देणे आवश्यक ठरते.

**२. चढ-उतारातील फरक (Range of Literacy):**

गेवराईमध्ये साक्षरतेतील फरक २२.८३% इतका आहे, म्हणजेच काही गावे अत्यंत साक्षर आहेत, तर काही खूपच मागे आहेत. माजलगावमध्ये हा फरक १७.४६% आहे, जो तुलनेने कमी आहे – यामुळे माजलगाव तालुक्यात शैक्षणिक स्थैर्य अधिक आहे.

**३. गावांची लोकसंख्या व साक्षरता:**

माजलगावमधील गावांची सरासरी लोकसंख्या ३,८५१ आहे, तर गेवराईमध्ये ती ३,३३७ आहे. मात्र, मोठ्या लोकसंख्येच्या गावांमध्ये साक्षरता नेहमीच अधिक असे नाही हेही स्पष्ट झाले आहे. उदा. गेवराईतील सैदापूर (७७० लोकसंख्या) मध्ये साक्षरता ७०.१३% आहे.

### ६.३ महत्त्वाचे निष्कर्ष:

१. दोन्ही तालुक्यांमध्ये साक्षरतेचा एकंदरीत दर्जा समाधानकारक आहे, पण राज्याच्या तुलनेत अजूनही मागे आहेत.

2. गेवराईमध्ये अधिक विसंगती (disparity) असून काही गावे खूप साक्षर तर काही खूपच कमी साक्षर आहेत.

3. माजलगावमध्ये साक्षरतेचे वितरण अधिक समतोल असल्याचे दिसते.

4. स्त्री-पुरुष साक्षरतेतील अंतराचे प्रत्यक्ष आकडे नसले तरी दोन्ही तालुक्यांमध्ये महिला साक्षरतेवर विशेष भर देण्याची गरज आहे.

5. लोकसंख्या व साक्षरता यांच्यात थेट संबंध नसून, स्थानिक पातळीवरील सुविधांचा दर्जा , सामाजिक जागरूकता, आणि धोरणांची अंमलबजावणी हे घटक अधिक प्रभावी ठरतात.

### ७. अंतिम निरीक्षणे व निष्कर्ष :

**१. साक्षरतेचा दर्जा :**

गेल्या काही वर्षांत बीड जिल्ह्यातील साक्षरता दरात लक्षणीय वाढ झाली आहे. विशेषतः गेवराई आणि माजलगाव तालुक्यांमध्ये साक्षरतेचा टक्केवारीत सुधारणा दिसून येते.

**२. पुरुष आणि महिला साक्षरता:**

पुरुष साक्षरतेच्या तुलनेत महिलांची साक्षरता कमी असली तरी महिला साक्षरतेत सुधारणा वेगाने होत आहे. यामुळे लिंगभेदाचा आढावा घेता येतो की महिला शिक्षणावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे. यामुळेच म्हणतात की घरातील एक महिला शिकलेली असेल तर पूर्ण घर साक्षर बनते.

**३. ग्रामिण व शहरी भागातील फरक:**

शहरी भागात साक्षरतेचा स्तर ग्रामीण भागांच्या तुलनेत जास्त आहे. हे मुख्यतः शाळा आणि शिक्षणसुविधांच्या उपलब्धतेमुळे आहे.

| | | **ऐकूण** | **पुरुष** | **स्त्रिया** |
|---|---|---|---|---|
| माजलगाव | **एकूण** | ७५.०६ | ८३.८० | ६५.७८ |
| | **ग्रामीण** | ७३.२३ | ८२.५९ | ६३.२८ |
| | **नागरी** | ८२.६० | ८८.८५ | ७६.०४ |
| गेवराई | **एकूण** | ७३.८५ | ८३.३० | ६३.८४ |
| | **ग्रामीण** | ७२.८१ | ८२.६० | ६२.४३ |
| | **नागरी** | ८३.२५ | ८९.७१ | ७६.५३ |

**स्पष्टीकरण:**

- माजलगावमध्ये शहरी भागातील साक्षरता ग्रामीण भागापेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे.
- शहरी भागात पुरुषांची साक्षरता ८८.८५% असून, स्त्रियांची ७६.०४% आहे.
- ग्रामीण भागात ही टक्केवारी अनुक्रमे ८२.५९% (पुरुष) आणि ६३.२८% (स्त्रिया) आहे.
- गेवराईतही शहरी भागातील साक्षरता ग्रामीण भागापेक्षा जास्त आहे.
- शहरी भागात पुरुषांची साक्षरता ८९.७१% असून, स्त्रियांची ७६.५३% आहे.
- ग्रामीण भागात ती अनुक्रमे ८२.६०% (पुरुष) आणि ६२.४३% (स्त्रिया
- शहरी भागात शिक्षणाच्या सुविधा जास्त असल्याने साक्षरतेचा स्तर अधिक आहे.
- स्त्रियांमध्ये साक्षरतेचा दर अजूनही पुरुषांच्या तुलनेत कमी आहे, विशेषतः ग्रामीण भागात.
- ग्रामीण भागातील साक्षरता सुधारण्यासाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे, विशेषतः स्त्रियांसाठी.

ह्या विश्लेषणातून शैक्षणिक धोरणे ठरवताना ग्रामीण भागावर विशेष लक्ष देण्याची गरज अधोरेखित होते.

**४.शिक्षणाच्या दर्जाचा परिणाम:**

उच्च शिक्षण प्राप्त लोकसंख्या प्रमाणात वाढल्याने स्थानिक रोजगार व आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे.

**५. सरकारच्या शैक्षणिक योजनांचा परिणाम** :

विविध शैक्षणिक योजनांमुळे ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार वाढला आहे, परंतु अजूनही अनेक गावांमध्ये शिक्षणाचा अभाव आहे.

**६. भविष्यकालीन सूचना:**

ग्रामीण भागातील शाळा आणि शिक्षणसंस्थांमध्ये अधिक सुधारणा करणे आवश्यक आहे. महिला शिक्षणावर विशेष भर देऊन साक्षरता वाढवावी. शैक्षणिक जागरूकता मोहिमा अधिक प्रभावीपणे राबवाव्यात. आर्थिक व सामाजिक अडचणींवर लक्ष देऊन शिक्षणात सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे.

**८. निष्कर्ष (Conclusion)**

बीड जिल्ह्यातील साक्षरता अभ्यासातून हे स्पष्ट झाले आहे की शिक्षणाच्या क्षेत्रात गेल्या काही वर्षांत सकारात्मक बदल झाले आहेत. विशेषतः माजलगाव आणि गेवराई तालुक्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढले असून, यामुळे सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. तरीही, ग्रामीण भाग आणि महिलांच्या साक्षरतेमध्ये अजूनही काही अंतर कायम आहे. शैक्षणिक सुविधा आणि योजनांचा परिणाम लाभदायक ठरला असला तरी, सर्वसमावेशक शिक्षणासाठी अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. महिला शिक्षणावर विशेष भर देणे, ग्रामीण भागातील शैक्षणिक अडचणी दूर करणे आणि सामाजिक जागरूकता वाढवणे हे पुढील टप्प्याचे मुख्य उद्दिष्ट असावे. अशा प्रकारे, साक्षरतेच्या माध्यमातून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधणे शक्य होईल.

**९. सूचना व उपाय (Suggestions & Recommendations)**

**१. महिला शिक्षणावर विशेष लक्ष देणे:**

महिला साक्षरता सुधारण्यासाठी शाळांमध्ये मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन योजना राबवाव्यात. पालकांना मुलींचे शिक्षण महत्त्वाचे असल्याचे समजावून सांगणे आवश्यक आहे.

**२. ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधा सुधारणा:**

ग्रामीण भागातील शाळा व शिक्षणसंस्थांमध्ये दर्जात्मक सुधारणा करावी, जसे की शिक्षण साहित्य, प्रशिक्षित शिक्षक, तसेच मूलभूत सुविधा उभारणी.

**३. रेवकी, माळीपारगावसारख्या गावांमध्ये विशेष साक्षरता मोहिमा राबवाव्यात:**

या गावांमध्ये साक्षरतेचा दर्जा तुलनात्मकपणे कमी असल्यामुळे, येथे विशेष लक्ष देऊन व्यापक साक्षरता अभियान राबवावे.

**४. शैक्षणिक जागरूकता मोहिमा:**

लोकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व वाढवण्यासाठी ग्रामपंचायती, स्वयंसेवी संस्था आणि शाळांद्वारे नियमित जागरूकता कार्यक्रम आयोजित करावेत.

**५. आर्थिक अडचणींवर उपाययोजना:**

गरीब कुटुंबातील मुलांना शैक्षणिक साहाय्य, अशा योजना राबवाव्यात ज्यामुळे आर्थिक अडचणींमुळे शिक्षणातून वंचित राहू नये.

**६. लिंगभेद कमी करणे:**

शिक्षणात लिंगभेद कमी करण्यासाठी विशेष योजना, बक्षिसे व सवलतींचा वापर करून मुलींचे शिक्षण वाढवावे.

**७. तांत्रिक व कौशल्याधारित शिक्षण:**

विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून देऊन त्यांना रोजगारक्षम बनवावे.

**८. शाळांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर:**

डिजिटल शिक्षण आणि ऑनलाईन साधनांचा वापर वाढवून शिक्षण अधिक प्रभावी व आकर्षक बनवावे.

**१०. संदर्भ (References):**

१ भारत सरकार, जनगणना अहवाल २०११
२ बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक आढावा (२०११ )
३ मोटे, पी.एन. (२०१० ). "साक्षरता आणि ग्रामीण विकास", पुणे विद्यापीठ प्रकाशन
४ रामोत्रा, बी. एल. (२००९ ). "महिला साक्षरता – एक आंतरशास्त्रीय दृष्टिकोन"
५ UNESCO Literacy Reports (२००५ –२०१५ )
६ लोकसंख्या भूगोल : डॉ. विठ्ठल घारपुरे